## झरोका

एक –अजित पवार गट वगळता भाजपा– शिंदे सेनेचे नेते कार्यकर्ते शरद पवार यांच्या राष्ट्रवादी पक्षात कसे काय येत आहेत हेच कळत नाही डोकं बधीर झालंय .

दुसरा– अरे, ही राजकीय चाल असते कोणत्याही परिस्थितीत सत्ता ही मराठ्याच्याच हाती असली पाहिजे हे सूत्र असते त्यामुळेच भाजपात ब्राह्मणी डोके असले तरी ते मराठी लोकांवर राजकारण– सत्ताकारण करीत असतात शिवसेना– काँग्रेस, राष्ट्रवादी– काँग्रेस आणि त्यातील गट हे मराठा दलित, मुस्लिम, बहुजन समाजाच्या मतावर राजकारण करीत असतात त्यामुळे पक्षांतर ही बाब ठरल्यानुसारच होत असते तू काळजी करू नकोस .

एक– अहो, अशाने शरद पवारच महाराष्ट्राच्या मानगुटीवर बसतील हा धोकाच वाटतो आहे म्हणून बोलतोय.

दुसरा– अरे, शरद पवारांना सत्ताकारनाची गरज नाही भाजपा नको आहे त्यात अजित पवार यांची गद्दारी नको आहे म्हणून ती आज घडीला क्रियाशील आहेत हे लक्षात घे.

एक– अहो, शरद पवारांना यशवंतराव चव्हाण, इंदिरा गांधी, राजीव गांधी, सोनिया गांधी यांच्यासह विरोधकांनाही धक्का दिला आहे त्यांच्यावर विसंबून कसे चालणार .

दुसरा– अरे, हेच तर न उलगडणारे कोडे आहे समजलं !

## काय बोलता राव ?

केंद्रीय राजकारणात भाजपा मित्र पक्षाच्या सहकार्यातून डोंगर उभा करीत असताना इंडिया महाविकास आघाडी राहुल गांधी, शरद पवार यांच्या माध्यमातून भाजपा राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा गड उध्वस्त करू पाहत असताना उत्तर प्रदेशात मात्र समाजवादी पार्टीचे अखिलेश यादव आणि बहुजन समाज पार्टीचे सर्वेसर्वा मायावती यांच्यातच जुपली असून सपा– बसपा युती तोडण्यात एकमेकावर खापर फोडले जात आहे.

### काय बोलता राव,

अरे, बिहार, उत्तर प्रदेश हा भाग यादवाचा आहे. उत्तर प्रदेशात कांशीराम यांच्यामुळे आंबेडकरी विचारातून बसपाने भाजपाच्या सहकार्यातून तळ ठोकला तो बहन मायावती यांना टिकविता आला नाही. केवळ सत्ता आणि पैसा या लोभासाठी बहन मायावती सैराट बनल्या आणि राज्यस्तरीय राष्ट्रीय सत्ताकारण गमावून बसल्याची चर्चा असली तरी आज त्याच सपाचे अखिलेश यादव यांच्यावर बोट मोडीत असल्या तरी अखिलेश राष्ट्रीय राजकारणात चर्चेत आहेत. पण बहन मायावती यांचे नाव उत्तर प्रदेशच्या राजकारणात ही उच्चारले जात नाही. कारण त्यांचा वारस त्यांचा भाचाच कारणीभूत ठरत आहे, मग बोला दाजीबा !

# डाव्यांचा डाव गेला !

## संपादकीय...

समाजकारण, राजकारण, सत्ताकारणात डावे –उजवे, मागचे–पुढचे, सरळ ,वाकडे असे कारणातून कारण होतच असते. ते लोकशाहीत घडतच असते परंतु या सर्व बाबीला बगलेत घेऊन उजव्या हाताला ठोकरून त्यांचीच टाळी घेऊन डावा विचार प्रकट करणे आणि तोच विचार तेवत ठेवण्यासाठी सदैव कार्यरत असलेले मार्क्सवादी पक्षाचे सर्वस्वी सीताराम येंच्युरी यांचे परवा निधन झाले आणि दाव्यांचा डाव गेला अशी शोककळा –शब्द पर्वली पसरली असेल तर त्यात दुमत नसावे कारण सिताराम येंचुरी पुन्हा कृतीशीलतेत कोणी अवतरणार नाहीच,परंतु डाव्याचा डाव गेला राहिला शरद पवार ही आरोळी उठली ती कितपत शरद पवार पेलणार हा ही प्रश्न्न चिंताग्रस्त वाटतो आहे त्यात संदेह नसावा .

भारतीय लोकशाहीत प्रत्येकाला हक्क व न्याय समान आहे. असणारच आहे त्यामुळे भारतीय राजकारणात सर्व पक्ष नेते कार्यरत असताना भारतात प्रथम काँग्रेसने सत्ता भोगली एक हाती सत्ता नकोच असे नागरिकांना कळू लागले त्यावेळी सत्ता पालट होत गेला परंतु माकपाच्या माध्यमातून सिताराम येंचुरी यांनी त्यांची विचारधारा सोडली नाही चूली पासून भाकरी पर्यंत सिद्धांत आणि त्यात हक्क व न्यायाचा धागा पकडून ग्रामपंचायत ते विधानसभा संसद भावना पर्यंतची मजल मारण्याची धडपड हा त्यांचा कार्यकारी पिंड होता पण त्यासाठी तडजोडीचा पर्याय नव्हता हे सिताराम एज्युरी यांचे वास्तव राजकीय प्रतिबंध होते हे कोणताही राजकारणी नाकारू शकत नाही.

सिताराम येंच्युरी हे सर्वपक्षीय मित्र होते जे कोणी येतील भेटतील त्यांना सत्ता देणे चूक –अचूक काय ते सांगणे हा त्यांच्या स्थायी स्वभाव होता परंतु कोणी घरी आला म्हणून त्यास माकपमध्ये ये ,माझे नेतृत्व स्वीकार कर –करा अशी कधीही मनोभावना त्यांनी अभ्यागताना केली नाही हेच त्यांचे मुख्य धोरण होते म्हणूनच डाव्यांचा डाव गेला हे शोकांतिका प्रकट होते आहे ती सहजासहजी नौटंकी नसावी असे वाटते .

सिताराम येंच्युरी यांनी जात –धर्म– पंथ वगैरे बाबींना दूर ठेवून महिला –पुरुष समान ठरवून लोकशाही संविधानातून जगण्याचा समाजकारण– राजकारण, सत्ता कारण करण्याचा हेतू बाळगून कार्यरत राहिले .संविधान करते डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या आदर्श डोळ्यासमोर ठेवून कर्पुरी ठाकूर ,प्रकाश करात यांच्या सहयोगाने सीताराम येंच्युरी हे कार्यरत राहिले त्यांना तळजळ मान्यच नव्हती म्हणूनच कम्युनिस्ट पक्षात मार्क्सवादी कम्युनिष्ट पक्ष आणि भारतीय कम्युनिष्ट पक्ष असे गट पडले तरीही ते डगमगले नाही त्यांचा वास्तववादी विचार कार्यप्रणाली हीच त्यांची ओळख ठरावी याच मार्गाने भारतीय राजकारणात शरद पवार हे कार्यरत आहेत– असावेत म्हणूनच डाव्याचा डाव गेला राहिले शरद पवार !

## पाच दिवसीय धम्म संस्कार प्रशिक्षण शिबिरास सुरुवात

लातूर : भगवान बुद्धाने मानवतेची सदाचरणाची शिकवण संपूर्ण जगाला दिली.सर्वच बौद्ध राष्ट्रांनी बौद्ध संस्कृती पारंपारिकपणे आपल्या देशात हजारो वर्षांपासून रुजवली आहे. धम्माचे गांभीर्य महत्व वृद्धी आणि जतन व जोपासना प्रांजळ व स्वाभिमानाने जागतिक बौद्ध करताना दिसून येतात.प्रत्येक बौद्ध देशांची बुद्ध वंदना पूजापाठ वेशभूषा उपोसथ कम्म ध्यान विपश्यना धम्म अभ्यास आणि ज्ञान यामध्ये एक वाक्यता व साम्यता आहे. बुद्धाचा विचार हा भारतात आणि जगात प्रसारित झाला आहे.बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी या आधुनिक काळात महामानव बुद्धांचा विचार राजा सम्राट अशोकाचे अनुकरण करीत लयास गेलेल्या बौद्ध संस्कृतीचे बीजारोपण सन १९५६ साली नागपूरला



केले. तेव्हा समाजात धम्माबद्दल अभ्यास ध्यान विपश्यना वंदना पूजापाठ सूत्रपटन, धम्माचरण या सर्वांमध्ये मोठा फरक दिसून येतो. धम्म जागृती व त्याद्वारे प्रत्यक्ष धम्माचा प्रसार, खरे आचरणशील बौद्ध बनविण्याचा एक प्रामाणिक प्रयत्न लातूर शहरात संस्कार शिबिर आयोजित करूण पु.भिक्खु पय्यानंद थेरो यांच्या मार्गदर्शना खाली दि. १४ सप्टेंबर पासून ते १८ सप्टेंबर २०२४ पर्यंत पाच दिवसांकरिता धम्म प्रशिक्षण दिले जाणार आहे. दररोज सकाळी आठ ते सायंकाळी साढे सहा वाजेपर्यंत धम्मप्रशिक्षण आणि भिक्खू – भिक्खुणी आणि बौद्ध विद्वानांद्वारे सतत वेगवेगळ्या विषयांवर मार्गदर्शन केले जाणार आहे.

शिबिराच्या सुरुवातीस महामानवांच्या प्रतिमेचे पुष्पाने धूपाने तथा दीपाने पुजन करण्यात आले. त्रिरत्न वंदने नंतर शिबिराचि सुरुवात झाली.कार्यक्रमाच्या यशस्वीते साठी केशव कांबळे, उदय सोनवणे असितकुमार कांबळे, अनिरुद्ध बनसोडे, करण ओहळ, सचिन सुरवसे, मिलिंद धावारे,आदींनी प्रयत्न केले.

## धिरज देशमुख यांनी प्रामाणिकपणे विकास कामे केली, पुन्हा आशिर्वाद द्या सामनगाव, चिखुर्डा येथे महिला मेळावा

लातूर प्रतिनिधी : लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघातील मतदारांनी धिरज देशमुख यांना पाच वर्षांपुर्वी भरभरुन आशिर्वाद दिले. त्यामुळे ते आमदार झाले. आमदार झाल्यानंतर धिरज देशमुख यांनी लातूर ग्रामीणचा प्रामाणिकपणे सर्वांगिण विकास केला. हा विकास मतदारांच्या आशिर्वादामुळे होऊ शकला. त्यामुळे आगामी काळातही मतदारांनी आमदार धिरज देशमुख यांच्या पाठीशी आशिर्वाद कायम ठेवावे, असे आवाहन विलास सहकारी साखर कारखान्याच्या चेअरमन श्रीमती वैशालीताई विलासराव देशमुख यांनी केले.



लातूर तालुक्यातील सामनगाव व चिखुर्डा येथे दि. १४ संप्टेंबर रोजी महिला बचत गटांचा मेळावा घेण्यात आला. त्याप्रसंगी बचत गटांच्या महिलांना संवाद साधताना श्रीमती वैशालीताई देशमुख बोलत होत्या. यावेळी रीड लातूरच्या अध्यक्षा सौ. दीपशिखा धीरज देशमुख, सुनिता अरळीकर,दैवशाला राजमाने, रविंद्र काळे यांची प्रमुख उपस्थिती होती. लातूर तालुक्यातील सामनगाव येथे गुरूलिंग बुलबुले यांच्या निवासस्थानी बचत गटांच्या महिलांची बैठक झाली.

यावेळी झालेल्या बैठकीत बोलतांना श्रीमती वैशालीताई विलासराव देशमूख म्हणाल्या कि, गेली दहा वर्ष आपल्या पक्षाचा खाजदार नव्हता यंदा आपल्या पक्षाचा खाजदार आपन सर्वानी निवडून दिला आहेत. त्यामुळे आपल्या सर्वांचे आभार. पुरूष मंडळींच्या सभा होत असतात. पुरूष मंडळी कोटेही जाते, मात्र महिलांना कुटेही जाता ऐत नाही म्हणून आम्ही तूमच्या अडी– अडचणी जाणून घेण्यासाठी आलो आहेत. आज ज्या महिला आल्या नाहीत त्यांना तूमी सागा कॉग्रेस पक्षहा सर्व गोर–गरीब, शेतकरी यांना सोबत घेवून चालनारा पक्ष आहे. भाजप सरकारने गेल्या दहा वर्षात अनेक आश्र्वासन आपल्याला दिले आहेत. पहिल्या पाच वर्षात त्यांनी सागीतले कि, आम्ही बाहेर असलेला काळा पैसा भारतात आणू आणि गौर गररीब जनतेला प्रतेकि १५ लाख रूपये देवू मात्र आज पर्यंत या सरकारने एक रूपयाही दिला नाही. त्यानंतर त्यानी सागीतले कि, युवक–युवतीना वर्षाला २ काटो नोकरी देणार असल्याचे सांगीतले मात्र तेहि या सराकारने दिले नाही. त्याचबरोबर आता लाडकी बहिन योजना या सरकारने काडली आहे. मात्र ही योजना निवडणूक होई पर्यंत चालू राहणार आहे. या सरकारचे लबाड्याच अवतन आहे. त्यामुळे या सरकारच्या जाहिरातीला बळू पडू नका असे आवाहन केले.

गेल्या अनेक वर्षापासून आपन सर्वानी पाहयल आहे. कि,कॉग्रेस पक्षाने आपल्या लातूर ग्रामीनसह जिल्ह्याचा विकास केले आहे. पुढील काळातही आपला आशिर्वाद ग्रामीनचे लोकप्रिय आमदार धिरज देशमुख यांना द्यावा. या विधानसभेत महायुतीचे सरकार पडणार आहे. आणि आपले सरकार येणार आहे. आपन आपल्या कॉग्रेस पक्षाशी एकनिष्ठ राहयच आहे. आपल्या आशिर्वादामुळे लोकसभेला कॉग्रेस पक्षाचा उमेदवार डॉ. शिवाजी काळगे यांना १ लाख ६२ हजार अधिक मतानी खाजदार म्हणून निवडून दिलात. तोच आशिर्वाद परत लातूर ग्रामीणचे आमदार धिरज देशमुख यांना देण्याचे आवाहन केले. हे महायुतिचे सरकार खोट्या जाहीराती करीत आहे. कॉग्रेस पक्षानी केलेले काम त्यांनी केले असे खोट्या जाहीराची फलक ते लावत आहेत. त्यांच्या या खोट्या जाहीराला बळी पडू नका असे आवाहन यावेळी केले.

महाविकास आघाडीचे खाजदार डॉ. शिवाजी काळगे यांनी आपन सर्वाधिक मतानी लोकसभा निवडणूकित विजयी केला आहात त्याबद्दल धन्यावाद.. काँग्रेस पक्षाने महाराष्ट्रात अनेक योजना राबल्या आहेत. मात्र त्या योजनेची खोटी जाहीरात कधीच काँग्रेस पक्षाने केली नाही. आपल्या पक्षाच्या योजना ही गोर– गरीब, शेतकरी, मजुर यांच्यासाठी राबवल्या जातात. त्यामुळे महाराष्ट्रात आपले हक्काचे सरकार आणायचे आहे. त्यासाठी आपले लातूर ग्रामींणचे आमदार धीरज विलासराव देशमुख यांना येणाजया विधानसभा निवडणूकीत आपला भाऊ, मुलगा निवडणूकीच्या मैदानात आहे म्हणून मोठ्या मताधीक्यानी विजयी करुन आपल्या लातूर ग्रामीणचा विकास करायची संधी पुन्हा एकदा द्यावी असे, आवाहन केले.

### आमदार धीरज विलासराव देशमुख यांनी विकास योजना गावापर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न केला सौ. दीपशिखा धीरज देशमुख

यावेळी रीड लातूरच्या संस्थापिका सौ. दीपशिखा धीरज देशमुख म्हणाल्या, आज आपल्या गावात येऊन आपल्याशी संवाद साधून आपल्या अडी–अडचणी जाणून घेऊन आनंद वाटला. गेल्या पाच वर्षांमध्ये आमदार धीरज विलासराव देशमुख यांनी आमदार म्हणून काम करताना जास्तीत जास्त विकास योजना गावापर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न केला प्रत्येक गावामध्ये त्यांनी गार–गरीब, शेतकजयांसाठी विविध योजनेच्या माध्यमातून काम करण्याचा प्रयत्न केला आहे. यापुढे देखील आपल्यासाठी ते असेच काम करीत

## जिल्हास्तरीय व विभागीय स्पर्धेत दयानंद विज्ञान महाविद्यालयाचे यश

लातूर : जिल्हा क्रीडा अधिकारी



कार्यालय,लातूर यांच्या वतीने घेण्यात आलेल्या म.न.पा.अंतर्गत विविध स्पर्धेत दयानंद विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयाचे विद्यार्थी जिल्हा स्तरावर सर्वप्रथम आले व विभागीय स्पर्धेसाठी पात्र ठरले.यामध्ये चि.प्रद्युम्न देशपांडे यांनी रायफल शूटिंग स्पर्धेत तसेच साईनाथ धाकपाडे यांनी कुस्ती स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळविला.धैर्यशील कातळे यांनी बुद्धिबळ स्पर्धेत प्रथम ,कुमारी देशपांडे गौरी बुद्धिबळ स्पर्धेत चतुर्थ क्रमांक,सुयश शेटे याने उशू स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळविला.प्रणिश आयाचित या विद्यार्थ्यांची राज्यस्तरीय टेबल टेनिस निवड चाचणीसाठी पात्र,जिम्नॅस्टिक स्पर्धेत ऋतुराज नाईक यांनी जिल्हास्तर व विभाग स्तरावर प्रथम क्रमांक येऊन राज्यस्तरीय स्पर्धेसाठी पात्र झालेला आहे.या यशस्वी सर्व खेळाडूंना डॉ.महेश बेंबडे,प्रा.निशिकांत सदाफुले,प्रा.विनोद गौरे यांचे मार्गदर्शन लाभले. सदरील स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थ्यांचे महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ.सिद्धेश्र्वर बेल्लाळे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.याप्रसंगी उपप्राचार्य प्रा.भाऊसाहेब सरवदे,पर्यवेक्षिका डॉ.वैशाली पाटील,पर्यवेक्षिका डॉ.संध्या कोल्हे,प्रा.भालचंद्र कोयलवार,प्रा. विजयकुमार मांदळे यांच्यासह इतर प्राध्यापक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

### उरूळी कांचनमधील इनामदार वस्तीजवळील घटना, तिघांवर गोळीबार झाल्याची माहिती

पुणे : गेल्या काही दिवसामध्ये पुण्यात मोठ्या प्रमाणावर गुन्हेगारी होताना दिसत आहे, अशातच आता उरूळी कांचन परिसरात इनामदार वस्तीजवळ येथे गोळीबाराची घटना घडली आहे. बापू शितोळे या व्यक्तीने तीन ते चार जणांवर गोळीबार केल्याची माहिती समोर आली आहे. या गोळीबारामध्ये काळुराम गोते हे गंभीर जखमी झाल्याचीही माहिती आहे. त्यांना उपचारासाठी खासगी रूग्णालयामध्ये दाखल करण्यात आले आहे. या गोळीबाराचे कारण अद्याप अस्पष्ट आहे. पोलीस घटनास्थळी पोहोचले आहेत, घटनेचा पंचनामा करण्याचं काम सुरू आहे. सतत घडणाऱ्या या घटनांमुळे पुणे शहरात कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला आहे.

## लातूर शहर व ग्रामीणची जागा शिवसेना लढणार – जिल्हाप्रमुख सचिन दान

लातूर/प्रतिनिधी: लातूर जिल्ह्यात शिवसेनेची मोठी ताकद आहे.या बळावर लातूर शहर व लातूर ग्रामीण या दोन विधानसभा मतदारसंघात निवडणूक लढविण्याचा निर्धार पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी केला असल्याची माहिती शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन दाने यांनी दिली.



लातूर शहर व ग्रामीण विधानसभा मतदारसंघातील पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या आढावा बैठकीनंतर झालेल्या पत्रकार परिषदेत दाने बोलत होते. ते म्हणाले की, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे हात बळकट करण्यासाठी,विधानसभा निवडणुकांच्या तयारी साठी शिवसेना लातूर जिल्हा,लातूर शहर आणि ग्रामीण विधानसभा मतदारसंघातील प्रमुख पदाधिकाऱ्यांची आढावा बैठक संपर्कप्रमुख अँड बळवंत जाधव यांच्या उपस्थितीत आणि शिवसेना लातूर जिल्हाप्रमुख सचिन दाने यांच्या अध्यक्षतेखाली लातूर विश्रामगृह येथे घेण्यात आली. पदाधिकाऱ्यांनी निवडणुकांसाठी जोमाने तयारीला लागावे.शाखा प्रमुख आणि बुथ प्रमुख ही शिवसेनेची प्रमुख यंत्रणा असून सर्व पदाधिकाऱ्यांनी नवीन शाखा स्थापना,शिवदूत, आणि नियुक्त्या करून आपल्या कार्यक्षेत्रातील जनतेचे प्रश्र्न सोडवावेत.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या जनकल्याणकारी योजना तळागाळातील लोकांपर्यंत पोचवाव्यात. लातूर शहर आणि लातूर ग्रामीण विधानसभा या दोन्ही जागा महायुतीतून शिवसेना पक्ष ताकदीने लढवणार आहे.जिल्ह्यात ६ विधानसभा मतदारसंघ असून महायुतीतील तीन पक्षांना प्रत्येकी दोन जागा मिळतील.त्याप्रमाणे शिवसेनेच्या हक्काच्या या दोन्ही जागा आहेत. आढावा बैठकीत अनेकांनी निवडणूक लढवण्याची तयारी दर्शवली असून या दोन्ही जागा लढवण्यासाठी शिवसैनिक तयार आहेत. पक्षश्रेष्ठी जो उमेदवार देतील,जो आदेश देतील तो शिरसावंद्य मानून सर्व शिवसैनिक आणि कार्यकर्ते ताकदीने निवडणूक लढवतील.या जागा आम्ही जिंकणारच असे दाने यांनी सांगितले.

मुख्यमंत्र्यांच्या आदेशाने प्रत्येक शाखा प्रमुख ते जिल्हाप्रमुख पदाधिकाऱ्याने रोज प्रत्येकाने लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थी १५ कुटुंबांना भेट द्यायची आहे.बुथ प्रमुखांनी सुधारित मतदारयाद्या वाचन करून शाखेतील पदाधिकाऱ्यांनी वॉर्ड निहाय तयारी करावी.येणाऱ्या निवडणुकीत पुन्हा शिवसेनेचेच एकनाथ शिंदे मुख्यमंत्री व्हावे यासाठी प्रत्येक शिवसैनिकाने महायुतीचे उमेदवार निवडून आणण्यासाठी कामाला लागायचे आहे. ही निवडणूक ताकदीने लढवायची आहे.त्यासाठी लागणारी सर्व यंत्रणा पक्ष उपलब्ध करून देणार असल्याचे दाने यांनी सांगितले.

लवकरच दोन्ही मतदारसंघात शिवसेनेचा भव्य मेळावा होणार असून विधानसभेवर भगवाच फडकणार असा निर्धार त्यांनी व्यक्त केला. या बैठकीस महिला जिल्हा संघटिका कल्पनाताई बावगे, उपजिल्हाप्रमुख ग्रामीण विजय जाधव,महानगर प्रमुख ऋषिकेश कदम, शहर प्रमुख ड.परवेझ पठाण,मुख्यमंत्री जनकल्याण कक्ष प्रमुख विष्णू बेडगे,रेणापूर शहरप्रमुख रवी चव्हाण, युवासेना जिल्हाप्रमुख कुलदीप सूर्यवंशी, युवराज वंजारे, युवती जिल्हा अध्यक्ष राधिका पाटील,तालुका प्रमुख राजकुमार सूर्यवंशी , मुरुड शहर प्रमुख अंकुश नाना कुंभार, प्रकाश पाटील वांजरखेडकर, राजकुमार कलमे, बाळकृष्ण अडसूळ , विष्णू साबदे , बाबुराव शेळके, कृष्णा सरवदे, औसा तालुका प्रमुख गणेश माडजे , सर्व तालुकाप्रमुख,तालुका संघटक, उपतालुकाप्रमुख,आजी –माजी पदाधिकारी,शिवसैनिक, विविध आघाड्यांचे प्रमुख मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## ऑलिम्पिक पदक विजेता स्वप्नील कुसाळेंचा मुख्यमंत्र्याकडून सत्कार

मुंबईः ऑलिम्पिक पदक जिंकून आल्यानंतर प्रथमच मराठमोळ्या स्वप्नील कुसाळे यांचा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सत्कार केला आहे. स्वप्नीलचे मार्गदर्शक व कुटुंबियांनी मुख्यमंत्री शिंदे यांच्याकडे बक्षिसाच्या रक्कमेत वाढ करण्याबाबत मागणी केली आहे.मुंबईत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वर्षा निवासस्थानावर गणेशोत्सवानिमित्त स्वप्नील कुसाळेंने गणपतीचे दर्शन घेतले. याप्रसंगी मुख्यमंत्री शिंदे यांनी उपरणे परिधान करून स्वप्नील कुसाळेंला गौरवित केले. यावेळी खासदार श्रीकांत शिंदेही उपस्थित होते. त्यानंतर स्वप्नील व मार्गदर्शक अष्टपुत्रे यांच्यासोबत मुख्यमंत्री शिंदे यांनी अर्धा तास चर्चा केली. यावेळी तब्बल ७२ वर्षांनी महाराष्ट्रासाठी पदक जिंकल्याबद्दल राज्य शासनाच्या बक्षिसाच्या रक्कमेत वाढ करावी, पुढील ऑलिम्पिकच्या तयारीसाठी बालेवाडी स्टेडियमजवळ सदनिका मिळावी ही मागणी त्यांचे कुटुंबिय व मार्गदर्शक यांच्याकडून मुख्यमंत्र्यांना करण्यात आली.

पॅरीस ऑलिम्पिकमध्ये ५० मीटर थ्री पोझीशन नेमबाजीत कांस्यपदकाचा पराक्रम करणार्या स्वप्नील कुसाळे यांच्या बक्षिसाच्या रक्कमे वाढ करून त्यांना सर्व सुविधा देण्याबाबत शासन कटिबध्द असल्याने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले आहे. कल्याणमधील शूटिंग रेजच्या भेटीचे निमंत्रण खासदार श्रीकांत शिंदे यांनी स्वप्नील कुसाळेंला देत आवश्यक सुविधांसाठी शासन पाठबळ देईल असे आश्र्वासन देण्यात आले आहे.

# अभियंता दिन

आज १५ सप्टेंबर, आजचा दिवस संपूर्ण देशात अभियंता दिन म्हणून साजरा केला जातो कारण भारतातील पहिले अभियंता भारतरत्न सर मोक्षगुडम विश्र्वेश्र्वरय्या यांचा हा जन्मदिवस. मोक्षगुडम विश्र्वेश्र्वरय्या हे केवळ अभियंता नव्हते तर ते थोर देशभक्तही होते. आजच्या दिवशी म्हणजे १५ सप्टेंबर १८६१ रोजी कर्नाटकातील कोलार जिल्ह्यातील मदनहल्ली या छोट्याश्या गावात त्यांचा जन्म झाला.

मोक्षगुडम विश्र्वेश्र्वरय्या यांचे वडील विद्वान संस्कृत पंडित होते. घरची परिस्थिती हलाखीची होती तरीही त्यांनी विश्र्वेश्र्वरय्या यांच्या शिक्षणात खंड पडू दिला नाही. विश्र्वेश्र्वरय्या यांनीही गरिबीशी झुंज देत तालुक्याला एकटे राहून आपले शिक्षण अव्वल गुणांनी पूर्ण केले. शालेय शिक्षण पूर्ण झाल्यावर ते उच्च शिक्षणासाठी बंगळुरुला आले. तिथेही त्यांनी विशेष गुणवत्ता मिळवत बी ए केले.

पदवीधर झाल्यावर त्यांना तांत्रिक शिक्षणाची आवड निर्माण झाली. पण तांत्रिक शिक्षण घेण्यासाठी पैसे नसल्याने त्यांनी म्हैसूरच्या राजाला विनंती केली. म्हैसूरच्या राजाने त्यांच्यातील गुणवत्ता हेरून त्यांना अभियांत्रिकी शिक्षणासाठी शिष्यवृत्ती देऊन पुण्याला पाठवले. विश्र्वेश्र्वरय्या यांनीही त्यांच्यावरील विश्र्वास सार्थ ठरवत अभियांत्रिकी परीक्षेत मुंबई प्रांतात प्रथम क्रमांक पटकावला. या त्यांच्या यशाची दखल घेऊन १८८४ साली सरकारने त्यांना सहाय्यक अभियंता या पदावर नेममुक दिली.

तिथेही त्यांनी आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवला. या काळात त्यांनी खडकवासला धरणासाठी एक अभिनव अशा स्वयंचलित गेटची निर्मिती केली. यामुळे विशिष्ट पातळी वरील अतिरिक्त पाणीच वाहून जाई. अशाप्रकारच्या गेटची निर्मिती भारतात पहिल्यांदाच झाली होती. या डिझाइनचे नाव पुढे विश्र्वेश्र्वरय्या गेट असे झाले. १९०७ साली त्यांनी सरकारी नोकरीतून निवृत्ती पत्करली. निवृत्तीनंतर निजाम सरकारने त्यांची विशेष सल्लागारपदी नियुक्ती केली. तिथे त्यांनी हैदराबाद परिसरातील दोन नद्यांवर धरणे बांधून हैदराबाद शहर पुरमुक्त केलेच शिवाय शहराचा कायापालट देखील केला.

म्हैसूरच्या राजाने त्यांना मुख्य अभियंता पदाची ऑफर दिली त्यांनी ती स्वीकारली. म्हैसूरचे मुख्य अभियंता असताना त्यांनी तिथे कृष्णराज सागर धरण, वृंदावन गार्डन बांधले तसेच विकासाची अनेक कामे केली. या व्यतिरिक्त त्यांनी उद्योग व शेती सिंचनाची अनेक कामे केली. पाण्याचा अपव्यय टाळून पुरेपूर वापर करणारी ब्लॉक सिस्टीम ही त्यांचीच देणगी आहे.

म्हैसूरचे पद सोडल्यावर त्यांनी अभियांत्रिकीच नव्हे तर उद्योग, शेती, नगर सुधारणा या योजनेत मोलाचे कार्य केले. विश्र्वेश्र्वरय्या हे उच्चविद्याविभूषित असूनही त्यांचे राहणीमान अतिशय साधी होती. म्हैसूरी पद्धतीचा फेटा आणि साधी वेशभूषा त्यांनी शेवटपर्यंत जपली. त्यांचे व्यक्तिमत्त्वही आकर्षित करणारे होते. ते जितके साधे होते तितकेच ते परखडही होते. अंधश्रद्धा त्यांना मान्य नव्हती. मानवात देव आहे.

मानव सेवा हीच ईश्र्वर सेवा असे त्यांचे मत होते. ते जसे बोलत तसे ते वागतही होते. वयाच्या ९४ व्या वर्षी भारत सरकारने त्यांना भारतरत्न या सर्वोच्च पुरस्काराने गौरविले. विश्र्वेश्र्वरय्या हे शतायुषी होऊन निरामय जीवन जगले. १४ एप्रिल १९६२ रोजी वयाच्या १०१ व्या वर्षी त्यांनी जगाचा निरोप घेतला.

पण त्यांनी केलेल्या कार्यकर्तृत्वाचा गौरव व्हावा म्हणूनच आजचा दिवस संपूर्ण देशात अभियंता दिन म्हणून साजरा केला जातो. विश्र्वगुडम विश्र्वेश्र्वरय्या यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

# अरणी फाउंडेशनच्या माध्यमातून शेतकरी – गोर गरिबांच्या मुलांना ऑनलाईन शिक्षणाची सुविधा : प्रा. शामसुंदर कुलकर्णी



लातूर : पुणे येथील अरणी फाउंडेशनच्या माध्यमातून शेतकरी – गोर गरिबांच्या पाचवी ते बारावी पर्यंत शिक्षण घेणाऱ्या मुलांना अतिशय नाममात्र शुल्कात दर्जेदार आणि गुणवत्तापूर्ण ऑनलाईन शिक्षणाची सुविधा उपलब्ध करून दिली जात असल्याची माहिती अरणी फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष प्रा. शामसुंदर कुलकर्णी यांनी शनिवारी लातुरात पत्रकार परिषदेत बोलताना दिली.

अरणी फाउंडेशन मागच्या २५ वर्षांपासून शैक्षणिक क्षेत्रात कार्यरत आहे. फाउंडेशनच्या माध्यमातून आतापर्यंत महाराष्ट्रातील लाखोंच्या संख्येने विद्यार्थ्यांनी शिक्षण घेऊन आपले उज्वल भवितव्य घडविण्याचे काम केले आहे. विद्यार्थी मोबाईलच्या माध्यमातून गुगलवर प्ले स्टोअरवर अरणी फाउंडेशन टाईप करून ॲप डाऊनलोड करून घेऊ शकतात. हे पूर्णतः मोफत आहे. सद्यस्थितीत ८० हजारांहून अधिक विद्यार्थी शालेय व स्पर्धात्मक परीक्षांचे मार्गदर्शन घेत आहेत. शालेय स्तरावर विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन करण्यासाठी फाउंडेशनकडे अनुभवी आणि उच्चशिक्षित कर्मचारी वर्ग आहे. कोरोनानंतर शिक्षण क्षेत्रात मोठा बदल झाला आणि ऑनलाईन शिक्षण पद्धती विकसित झाली. समाजातील शेतकरी, तळागाळातील गोरगरीब विद्यार्थ्यांनाही ऑनलाईन पद्धतीने शिक्षण अगदीच माफक शुल्कात उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने आपण शिक्षण क्षेत्रातील मान्यवरांना सोबत घेऊन अरणी फाउंडेशनची स्थापना केल्याचे सांगून प्रा. शामसुंदर कुलकर्णी म्हणाले की, विद्यार्थ्यांना इयत्ता पाचवी ते बारावी पर्यंत गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळाले तर विद्यार्थी एमपीएससी – यूपीएससी सारख्या परीक्षेतही नेत्रदीपक यश संपादन करू शकतात.आपल्या अरणी फाउंडेशनच्या माध्यमातून आपण अनेक आश्रम शाळांना मोफत ऑनलाईन शिक्षणाची सुविधा उपलब्ध करून देतोय. गणित , विज्ञान आणि इंग्रजी या विषयांसाठी नाममात्र प्रतितास एक रुपया एवढे अल्प शुल्क आकारतो. जे विद्यार्थी हे शुल्क देण्यास असमर्थ आहेत, त्यांना मोफत सुविधा दिली जाते. मराठी माणसाची सर्वांगीण प्रगती व्हावी. एमपीएससी – यूपीएससी सारख्या स्पर्धा परीक्षेत जास्तीत जास्त विद्यार्थी यशस्वी व्हावेत,अशी आपली अपेक्षा कुलकर्णी यांनी यावेळी बोलताना व्यक्त केली.

शिक्षण क्षेत्रात मागच्या २७ वर्षांपासून कार्यरत असताना आपण उत्कृष्ट कार्य करण्याचा प्रयत्न केला आहे. पैसे न घेता दर्जेदार शिक्षण देऊन भावी पिढी घडवण्याचा आपला मानस आहे. आपल्या संस्थेसाठी कोणी इच्छुक सहकार्य – मदत करण्यासाठी पुढे आल्यास आपण रोख स्वरूपात मदत न स्वीकारता ती शैक्षणिक साहित्याच्या स्वरूपात स्वीकारतो. आपल्या फाउंडेशनच्या माध्यमातून स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना केवळ पाचशे रुपये वार्षिक शुल्क आकारले जात असल्याचेही प्रा. कुलकर्णी यांनी सांगितले. सध्या आपल्याकडे एकूण ८० हजार विद्यार्थी शिक्षण घेत असून त्यापैकी ६० हजार विद्यार्थ्यांकडून एक रुपयाही शुल्काच्या रूपाने घेतला नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. ऑनलाईन शिक्षण मोबाईलच्या माध्यमातून दिले जाते. विद्यार्थ्यांनी मोबाईलचा वापर गेम खेळण्यासाठी न करता अभ्यासासाठी केल्यास मोबाईलचे दुष्परिणाम काहीही होणार नाहीत असेही ते म्हणाले. छत्रपती संभाजीनगर , बाणेर , पुणे या ठिकाणी संस्थेच्या वतीने उभारण्यात आलेल्या अद्यावत स्टुडिओच्या माध्यमातून हे ऑनलाईन शिक्षण देण्यात येते. राज्यातील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचण्याचा आपला प्रयत्न असल्याचेही प्रा. शामसुंदर कुलकर्णी यांनी सांगितले. यावेळी प्रा. बाळासाहेब घुगे यांचीही उपस्थिती होती.

# मनाची अस्वस्थता संवादान दूर होऊ शकते आणि सकारात्मक काही घडू शकत – डॉ. अच्युत गोडबोल

मुंबई : माणसाचं मन हे फार चंचल असते. जन्मल्यापासूनच त्याला प्रत्येक गोष्टीचं कुतूहल असते. मन चिंती ते वैरी न चिंती असं म्हणतात कारण विचार करणं हे कित्येकदा त्याच्या हाताबाहेर गेलेले असते. असंख्य विचारांनी आपले मन कायम गुंतलेले असते. एखाद्या घराची खिडकी किंचित उघडी असेल तर त्या डोकावून पाहण्याचा मोह भल्याभल्यांना होतो त्यामुळेच आत्मचरित्राचा वाचक वर्ग खूप मोठा आहे. दुसऱ्याच्या आयुष्यात काय चालले आहे हे पाहणे जर इतकी स्वभाविक वृती असेल तर माणूस समोर असता त्याच्याशी संवाद करणे हेही तितकेच स्वाभाविक आहे. जिथे आपल्याच माणसाच्या मनाचा थांग आपल्याला लागत नाही तिथे दुसऱ्याच्या मनात डोकावून बघणे अधिकच कठीण बाब होऊन बसते. दुसऱ्याच्या मनाचा कप्पा किंचित किलकिला करणे साध्य होतेच असं नाही. मनाची अस्वस्थता मग ती आपली असो व इतर कुणाची, वैयक्तिक कारणाने असो वा आणखी कुठल्याही, ती संवादान दूर होऊ शकते आणि सकारात्मक काही घडू शकतं असा सूर विद्या निकम यांच्या 'अस्वस्थ मनाचे पडघम' ह्या सार्थ शीर्षक असलेल्या ललित लेखसंग्रहात मांडले आहे. विद्या निकम ही प्रतिभेचा तिसरा डोळा लाभलेली लेखिका असून तिने तिच्या अवतीभवती घडणाऱ्या घटनांचे , आलेल्या अनुभवांचे ,सूक्ष्म निरीक्षण करून – सोप्या रसाळ लेखन शैलीचा कोलाज या ललित लेख संग्रहातून



मांडला आहे असे गौरवोदगार श्री . अच्युत गोडबोले यांनी काढले . श्री विघ्नहर्ता प्रतिष्ठान आणि अष्टगंध प्रकाशन यांच्या सयुक्त विद्यामाने दादर पूर्व येथील मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय सुरेंद्र गावस्कर सभागृहात विद्या निकम यांच्या 'अस्वस्थ मनाचे पडघम 'या ललित लेखसंग्रहाचा प्रकाशन सोहळा संपन्न झाला. याप्रसंगी सुप्रसिद्ध लेखक अच्युत गोडबोले यांनी आपले विचार मांडले. ज्येष्ठ नाटककार प्रेमानंद गज्वी, सिने नाट्य दिग्दर्शक कुमार सोहनी आणि महाराष्ट्र सांस्कृतिक मंडळाच्या सचिव, कवयीत्री डॉ. मीनाक्षी पाटील प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

अच्युत गोडबोले पुढे असेही म्हणाले की, ललित लेखांमधील लेखिकेला भेटलेली स्त्री पात्रे लक्षवेधी आहेत .बाईचा उपजत शहाणपण आणि तिचं आत्मभानदेखील अधोरेखित करते. जीवनातला साधेपणा, जिवंतपणा, सहजता टिकवण्याकरीता संहाराला सर्जनता हेच उत्तर आहे अशी चिकित्सक स्वतंत्रदृष्टी लेखिकेला गवसली आहे. वाचताना ,बघतांना आणि जगताना आलेले अनुभव लेखिकेच्या मनपटलावर पडघम वाजवू लागतात आणि त्याचे पडसाद वाचकांच्या मनावर उमटविण्यात लेखिका यशस्वी झाली आहे असं म्हणायला हरकत नाही.

विद्या निकम आपल्या भाषणात म्हणाल्या की, मनातील घुसमट, मनाची होणारी तगमग यास कुठेतरी वाट करून द्यावी असे वाटले तर त्यात काही वावगे नाही. आणि ही अस्वस्थता असल्यामुळेच तर लिहिणे होते. ते ललितकथा आणि कवितेमधून कायम राहील याचीही खात्री आहेच.

श्री. कुमार सोहनी व डॉ. मीनाक्षी पाटील यांनी दोन्ही पुस्तकांचे तौलनिक मूल्यमापन केले. प्रकाशक श्री संजय शिंदे यांनी प्रास्ताविक केले. तर श्री विघ्नहर्ता प्रतिष्ठानचे अध्यक्ष दत्ता मोरे यांनी आभार मानले सौ. सीमा सावंत यांनी प्रकाशन सोहळ्याचे यथोचित सूत्रसंचालन केले.

# कांदा, बासमतीवरील निर्यातमूल्य हटविण्याचा, खाद्यतेलाच्या आयातीवर शुल्क आकारण्याचा केंद्राचा निर्णय




मुंबई : कांदा, बासमती तांदळावरील निर्यातमूल्य रद्द, कांद्याच्या निर्यात शुल्कात घसघशीत कपात तसेच खाद्यतेलावरील आयात शुल्क वाढविण्याच्या केंद्र सरकारच्या निर्णयांबद्दल भारतीय जनता पार्टीचे ज्येष्ठ नेते आणि राज्य कृषी मूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल यांनी केंद्र सरकारचे आभार मानले आहेत. मोदी सरकारने कांद्यावरील निर्यातमूल्याची अट हटवून निर्यातशुल्कही निम्म्याने कमी करत २० टक्के केल्यामुळे कांदा निर्यातदारांना हव्या त्या किमतीत कांदा निर्यातीची संधी प्राप्त होणार आहे. कांदा, बासमती तांदूळ, सोयाबीन आणि तेलबिया उत्पादक शेतकऱ्यांच्या शेतमालाला जास्त भाव मिळण्याच्या दृष्टीने हे निर्णय निश्र्चितपणे क्रांतीकारी ठरतील असा विश्र्वास श्री. पटेल यांनी शनिवारी व्यक्त केला. भाजपा प्रदेश कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषेदत ते बोलत होते. यावेळी प्रदेश प्रवक्ते ओमप्रकाश चौहान उपस्थित होते.

यावेळी श्री. पटेल म्हणाले की, देशांतर्गत कांद्याची उपलब्धता वाढावी आणि ग्राहकांना रास्त दरात कांदा उपलब्ध करून देण्यासाठी केंद्र सरकारच्या वाणिज्य मंत्रालयाने गेल्या वर्षी किमान निर्यात मूल्य ५५० डॉलर प्रतिटन ठेवले होते. आता कांद्याची आवक कमी झाल्यानंतर केंद्र सरकारने कांद्याच्या निर्यात धोरणात सुधारणा करत कांदा निर्याती वरील ५५० डॉलर निर्यातमूल्य हटवले आहे. तसेच कांद्यावर आता ४० टक्के निर्यात शुल्काऐवजी २० टक्के शुल्क आकारणी करण्यात येणार आहे. खाद्यतेलाच्या आयातीवरही आधी कोणतेच शुल्क नव्हते, त्यावर आता २० टक्के शुल्क आकारण्याचा निर्णयही घेण्यात आला आहे. त्यामुळे सोयाबीन उत्पादकांना अधिक किंमत मिळेल. याशिवाय रिफाइंड सोयाबीन, सूर्यफूल आणि पामतेलावर आयात शुल्क १२.५० टक्क्यांवरून ३२.५० टक्के करण्यात आले आहे. हे निर्णय घेऊन केंद्र सरकारने शेतकरीवर्गाला दिलासा दिला आहे. कांद्याच्या किमतीमध्ये सुधार होणार असून, सोयाबीनच्या किंमती वाढून शेतकऱ्यांना चांगला दर मिळेल असेही श्री. पटेल यांनी नमूद केले.कांदा आयात निर्यात विषयात भाजपा नेत्यांना काही कळत नाही असे वक्तव्य करणाऱ्या रोहित पवार यांचा पाशा पटेल यांनी खरपूस समाचार घेतला.

शरद पवार केंद्रीय कृषी मंत्री असताना खाद्य तेलावरील आयात शुल्क शून्य टक्के केल्यामुळे देशांतील शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले होते, याची आठवण श्री. पटेल यांनी करून दिली.

# हिंदी भाषा रोजगाराभिमुख भाषा – डॉ.साईनाथ उमाटे

लातूर : हिंदी भाषा ही आपल्या मनातल्या सुख–दुःखाच्या भावभावना व विचार प्रकटीकरणाचे समाज व्यवहाराचे प्रभावी असे माध्यम आहे.हिंदी ही जन,मन आणि धनाची भाषा आहे.हिंदी भाषेत ज्ञानाचे प्रचंड असे भांडार आहे. हिंदी ही बॅंकिंग क्षेत्र,सिनेमासृष्टी,मीडिया क्षेत्र,

जाहिरात क्षेत्र,भाषांतर,अनुवाद क्षेत्र,लेखन आणि स्पर्धा परीक्षा अशा अनेक क्षेत्रात रोजगार देणारी रोजगाराभिमुख भाषा आहे.ती विविधतेतून राष्ट्रीय एकात्मता व अखंडता साधण्याचे काम करते.अशा या हिंदी भाषेचा आदर व सन्मान सर्वांनी करावा,असे प्रतिपादन दयानंद वाणिज्य महाविद्यालयातील हिंदी विभाग प्रमुख डॉ.साईनाथ उमाटे यांनी केले.



येथील दयानंद विज्ञान महाविद्यालयात हिंदी विभागाच्या वतीने दि.१४ सप्टेंबर २०२४ रोजी ' हिंदी दिवस ' साजरा करण्यात आला.यावेळी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ.सिद्धेश्र्वर बेल्लाळे होते.याप्रसंगी हिंदी विभाग प्रमुख डॉ.गजानन बने,मराठी विभाग प्रमुख डॉ. रामशेट्टी शेटकार यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी डॉ.रामशेट्टी शेटकार असे म्हणाले की,मातृभाषा मराठी,राष्ट्रभाषा हिंदी आणि जागतिक भाषा इंग्रजी या तिन्ही भाषेचे मानवी जीवनात अनन्यसाधारण असे महत्त्व आहे.या तिन्ही भाषेतून मनातल्या भावना अभिव्यक्त करता येतात.हिंदी ही विश्र्व स्तरावरची प्रभावी भाषा म्हणून प्रचंड उभारी देणारी रोजगाराभिमुख भाषा आहे.

प्रास्ताविक डॉ.गजानन बने यांनी केले तर आभार बुशरा शेख या विद्यार्थिनीने मानले.सूत्रसंचालन विशाल मस्के,वैभवी माने व तृप्ती बिराजदार यांनी संयुक्तरित्या केले.प्रमुख पाहुण्याचा परिचय प्रज्वल जाजे यांनी करून दिला.याप्रसंगी सुनील राक्षे,हरिओम पाटोळे,राजेसाहेब पांचाळ यांच्यासह इतर प्राध्यापक,शिक्षकेत्तर कर्मचारी बहुसंख्येने उपस्थित होते.

# १५ सप्टेंबर रोजी शिर्डी येथील 'पेन्शन राज्य अधिवेशनात प्राध्यापकांनी सहभागी व्हावे अध्यक्ष डॉ. सुर्यकांत जोगदंड

लातूर : महाराष्ट्रातील सर्व कर्मचार्यांना 'जुनी पेन्शन योजना' लागू करावी या मागणीसाठी 'महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन संघटना' व कर्मचारी समन्वय समितीने दि. १५ सप्टेंबर २०२४ रोजी शिर्डी, जि. अहमदनगर येथे 'पेन्शन राज्य अधिवेशन' आयोजित केले आहे. या अधिवेशनात प्राध्यापकांनी सहभागी व्हावे असे आवाहन अध्यक्ष डॉ. सुर्यकांत जोगदंड यांनी केले आहे.

महाराष्ट्र शासनाने १ नोव्हेंबर २००५ रोजी व नंतर नियुक्त कर्मचाऱ्यांना डीसीपीएस/ एनपीएस योजना' सुरू केली. त्यानंतर केंद्र व राज्य सरकारने २४ व २५ सप्टेंबर २०२४ रोजी अनुक्रमे 'एकीकृत निवृत्तीवेतन योजना' (ण.झ.ड.) व 'सुधारित पेन्शन योजना' लागू करण्याची घोषणा केली आहे. या सर्व पेन्शन योजनांचे स्वरूप बघता या योजना निव्वळ फसव्या असून त्यातून सेवानिवृत्त कर्मचारी व त्यांचे कुटुंबीयांना सामाजिक व आर्थिक स्थैर्य मिळणे कठीण आहे.

त्यामुळे १ नोव्हेंबर २००५ नंतर नियुक्त सर्व कर्मचाऱ्यांना म.ना.से. अधि. १९८२ व १९८४ अंतर्गत जुनीच पेन्शन योजना पूर्ववत लागू करावी अशी मागणी राज्यातील १७ लाख कर्मचाऱ्यांच्यावतीने सातत्याने विविध आंदोलने, मोर्चे, उपोषणे आदि माध्यमातून केली जात आहे.

नवीन पेन्शन योजनेतील राज्यातील जवळपास ८ लाख २७ हजार कर्मचाऱ्यांचा सुधारित पेन्शन योजनांना विरोध असून केवळ जुनी पेन्शन योजनाच कर्मचाऱ्यांच्या हिताची आहे हे राज्य शासनाला ठणकावून सांगण्यासाठी दि १५ सप्टेंबर २०२४ रोजी संत जनार्दन स्वामी आश्रम शेजारी, शिर्डी जि. अहमदनगर येथे महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन संघटनेच्या पुढाकारातून पेन्शन महाअधिवेशन आयोजित करण्यात आले आहे.

राज्य पातळीवर महाराष्ट्र प्राध्यापक महासंघ (एमफुक्टो) व स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड अंतर्गत 'एमफुक्टो' संलग्नित 'स्वामुक्टा' प्राध्यापक संघटनेच्यावतीने या राज्यस्तरीय पेन्शन अधिवेशनाला जाहीर पाठिंबा देण्यात आला आहे. 'स्वामुक्टा'चे सर्व पदाधिकारी व प्राध्यापकांनी मोठ्या संख्येने या पेन्शन अधिवेशनात सक्रीयपणे सहभागी व्हावे असे आवाहन संघटनेचे अध्यक्ष डॉ. सुर्यकांत जोगदंड, सचिव डॉ. विजय भोपाळे, कोषाध्यक्ष डॉ. दिलीप पाईकराव, उपाध्यक्ष डॉ. डी. एन. मोरे, समन्वयक डॉ.अमोल लाटे व केंद्रीय कार्यकारिणी पदाधिकारी डॉ. गोपाळ मोघे, डॉ. टी.आर.फिसफिसे, डॉ. सुनील व्हावारे, डॉ. करुणा देशमुख, प्रा. डी.आर.भुरे, डॉ. गौतम दुथडे, डॉ. सुधीर वाघ, डॉ. किशोर हुगे, डॉ. जयद्रथ जाधव, डॉ. रामचंद्र भिसे, डॉ. नानासाहेब पाटील, डॉ. काशिनाथ चव्हाण, डॉ. प्रभाकर जाधव,डॉ.संजीव अग्रवाल, डॉ. मनोजकुमार सोमवंशी, डॉ. रावसाहेब इंगळे, डॉ. बाळासाहेब गित्ते, डॉ. एस.आर. यादव यांनी केले आहे.

# वडार समाजाच्या विविध मागण्यासाठी ॲड. तुकाराम माने यांचे अमरण उपोषण

लातूर : महाराष्ट्रातील वडार समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी दि. १४ सप्टेंबर २०२४ पासून लातूर जिल्हाधिकारी कार्यालयाच्या समोर अमरण उपोषण खालील मागण्यासाठी ॲड. तुकाराम माने करीत आहेत.




शासनाने त्वरीत खालील मागण्या मान्य कराव्यात १. कै. मारुती चव्हाण वडार समाज आर्थिक विकास महामंडळाची तात्काळ अमलबजावणी करावी, २. प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी वडार समाजाच्या १०० विद्यार्थ्यांचे स्वतंत्र्य वस्ती गृह सुरू करावे, ३. रोहिणी अयोगाच्या केंद्र शासनाला केलेल्या शिफारशी अनुसार वडार समाजाला ९ टक्के आरक्षण लागू करावे. ४. जात प्रमाणपत्र मिळण्यासाठी १९६१ च्या पुराव्याची अट्ट रद्द करावी.५. नॉन क्रिमीलियरची अट रद्द करावी. ६. वडार वस्ती सुधारण्यासाठी स्वतंत्र्य अर्थिक तरतुद करण्यात यावी. ७. वडार समाजातील मजूर संस्थांना प्राध्यान्याने शासकीय कंत्राटाची कामे देण्याची तरदूद करावी. ८. वडार समाजातील स्पर्धा परिक्षार्थी व तसेच नव उद्योजकांना विशेष आर्थिक साहय्याची तरतुद करण्यात यावी. ९. व्यवसायिक शिक्षणासाठीची राज्य शासनाने बंद केलेली शिष्यवृत्त पुन्हा सुरू करावी. १०. बी.आर. इदाते समितीच्या आव्हालाची अमलबजावणी तात्काळ करण्यात यावी. सदर मागण्या शासनाने त्वरीत मंजूर कराव्यात मागण्या मंजूर होई पर्यंत अमरण उपोषण मागे घेणार नाही. असे प्रसिद्ध पत्रकाद्वारे कळविले आहे.

# गंजगोलाईतील दुकान मालकांनी केलेल अतिक्रमण काढावे जनहित युवा संघटनेने मनपा आयुक्तांना दिले निवेदन.

लातूर प्रतिनिधी,–लातूर येथील नावाजलेल्या महाराष्ट्रात प्रसिद्ध असलेल्या विविधतेने नटलेल्या १६ रस्त्यांना जोडणारा प्रसिद्ध बाजारपेठ म्हणजे गंजगोलाई या सर्व विविध १६ रस्त्यांना जोडणारे रोड मेन रोड, कापड लाईन, भुसार लाईन, चुरमुरे मसाला लाईन, मस्जिद रोड, भाजी मार्केट, नांदेड रोड, नावंदर मार्ग, नवयुग टाकी मार्ग, शिवाजी महाराज मार्ग, सोनार लाईन, लोखंड लाईन मार्गावरील व्यापारी दुकानदाराने दुकाना व्यतिरिक्त समोर फुटपाथवर, रोडवर व्यापाऱ्यांनी टेबल व इतर साहित्य ठेऊन केलेल्या अतिक्रमणामुळे ग्राहकांना, महिला, नागरिकांना, पादचार्यांना, वाहन चालकांना रहदारी करतांना मोठी कसरत करावी लागत असून जाण्यासाठी मज्ञाव करीत अतिक्रमण करून अर्धा रोड चक्क दुकानदारीने बंद करून रहदारीस अडथळा निर्माण करीत आहेत यामुळे नागरिकांना अपघातांना सामोरे जावे लागत असल्याने आज शुक्रवार दिनांक १३ सप्टेंबर २०२४ रोजी लातूर महानगरपालिका आयुक्त बाबासाहेब मनोहरेसह सी झोन क्षेत्रीय अधिकारी पवन सुरवसे यांना दुकानासमोरील रोडवर केलेल्या रस्त्यावर जाण्या येण्यासाठी अडथळा निर्माण होत असलेले अतिक्रमण तात्काळ काढावे व गंजगोलाईतील रस्त्यांनाही मोकळा श्र्वास द्यावा म्हणून जनहित युवा संघटनेने आज निवेदन देत आयुक्तांशी चर्चा केली.

याप्रसंगी जनहित युवा संघटनेने दिलेल्या निवेदनावर अतिक्रमण तात्काळ न हटवल्यास येणाऱ्या पुढील काळात लोकशाही पद्धतीने मोठे आंदोलन करणार असल्याचेही यावेळी आयुक्तांशी चर्चा करताना सांगितले.यावेळी जनहित युवा संघटना महाराष्ट्र राज्याचे प्रदेशाध्यक्ष बाबासाहेब बनसोडे, जनहित युवा संघटना महाराष्ट्र राज्य मराठवाडा अध्यक्ष दीपक गंगणे, सामाजिक कार्यकर्ते हातिम भाई शेख,नितीन चालक आदींसह इतर सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी लातूर शहरातील माजी नगरसेवक अजय दुडिले यांच्या निवासस्थानी दिली भेट

लातूर प्रतिनिधी : राज्याचे माजी



वैद्यकीय शिक्षण,सांस्कृतिक कार्यमंत्री तथा लातूरचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी शनिवार दि.१४ सप्टेंबर रोजी दुपारी लातूर शहरातील कव्हा रोडवरील २ नं शिवनेरी गेट शेजारील लातूर शहर महानगरपालिकेचे माजी नगरसेवक अजय दुडिले यांच्या रामचंद्र निवासस्थानी भेट देऊन त्यांच्याशी विविध विषयावर चर्चा केली.

यावेळी लक्ष्मी बहुउद्देशीय पतसंस्था लातूरचे चेअरमन प्रल्हाद दुडिले,लातूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती जगदीश बावणे ट्वेंटीवन शुगरचे व्हाईस चेअरमन विजय देशमुख अशोक (गट्टूशेठ) अग्रवाल, तुळशीराम गंभीरे अजिंक्य सोनवणे किशोर बिदादा सचिन मोरे सुरेश धानूरे,अंकलकोटे, बळवंत पाटील आनंद मालू आदीसह दुडिले कुटुंबीय मित्रपरिवार उपस्थित होते.

## लाहोटी स्कूलमध्ये श्यामसुंदर भार्गव यांना श्रद्धांजली

लातूर : श्री मारवाडी राजस्थान



शिक्षण संस्थेचे माजी सचिव श्यामसुंदर भार्गव यांचे नुकतेच दीर्घ आजाराने निधन झाले आहे. श्यामसुंदर भार्गव गेल्या अनेक दिवसांपासून आजारी होते. मृत्युसमयी ते ७५ वर्षांचे होते. त्यांच्या निधनाबद्दल राजा नारायणलाल लाहोटी इंग्लिश स्कूल मध्ये शोक व्यक्त करत शिक्षक, कर्मचारी व विद्यार्थ्यांनी सामुहिक श्रद्धांजली अर्पण केली.

शोक सभेत बोलताना स्कूलचे रजिस्ट्रार प्रवीण शिवणगीकर म्हणाले की नैतिकता, मूल्ये, शिस्तीचे समानार्थी शब्द म्हणजे श्यामसुंदरजी भार्गव, ज्यांना भाऊ म्हणून ओळखले जाते, त्यांनी संस्थेच्या सर्व क्षेत्रांत वाढ करण्यात नेहमीच महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. संस्थेच्या शाळांमधील गुणवत्ता वाढविण्यावर त्यांनी दृढ लक्ष केंद्रित केल्याने आमच्या प्रशिक्षण आणि मानव संसाधन क्षमतांमध्ये मोठी भर पडली.शाळेतील सर्व कॅडरमध्ये नेतृत्व विकसित करण्याच्या त्यांच्या प्रबळ इच्छाशक्तीमुळे परिणामाभिमुख मानव संसाधने निर्माण झाली आहेत. त्यांच्या कार्यकाळात त्यांनी केवळ व्यवस्थाच विकसित केली नाही तर संस्थेमध्ये मूल्यावर आधारित कार्यसंस्कृतीही प्रस्थापित केली. आपल्या संवादातून, संबोधनातून त्यांनी नेहमीच संस्थेचे संस्थापक सेठ पुरणमलजी लाहोटी यांचे स्वप्न साकार करण्याचा प्रयत्न केला. विद्यार्थी, कर्मचारी यांच्यामध्ये समृद्ध मूल्ये आणि स्वयंसेवीपणा आत्मसात करण्यात त्यांचे विलक्षण योगदान आहे. विद्यार्थिनींना मदतीचा हात देण्यासाठी त्यांनी 'गोदावरीच्या लेकी' उपक्रमाची सुरुवात केली.

### बुधवारी मुंबईत आंतरराष्ट्रीय बांबू दिनाचे आयोजन

मंबई: वातावरण बदलाच्या संकटाला सामोरे जात असताना महाराष्ट्रात बांबू लागवडीला प्रोत्सहन देऊन बांबू आधारित प्रक्रिया आणि मूल्यवर्धनासाठी राष्ट्रीय पातळीवरील तज्ञांसमवेत महत्वपूर्ण परिसंवादचे आयोजन बुधवारी ( ता.१८) फिनिक्स फाउंडेशन, लोदगा जि.लातूर यांच्या वतीने मुंबईतील यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान सभागृहात करण्यात आले आहे.

जगभरातील वातावरण बदलाचे संकट थोपवण्यासाठी बांबू लागवड आणि हरित महाराष्ट्राचे धोरण राज्य सरकारने निश्र्चित केले आहे.

# संकटकाळात उपयोगी ठरतील आचार्य चाणक्य यांनी सांगितलेल्या 'या' ४ गोष्टी

आचार्य चाणक्य हे भारतातील खूप मोठे विद्वान होते. ते चंद्रगुप्त मौर्य यांचे गुरुदेखील होती. त्यांनी दिलेल्या उपदेशांचे चंद्रगुप्त मौर्य यांनी पालन केल्याचाही उल्लेख आढळतो. चाणक्य यांनी नीति शास्त्रची रचना केली. ज्याला चाणक्य निती या नावाने ओळखले जाते. चाणक्य नितीत सांगितलेल्या उपदेशाचे पालन केल्यास त्या व्यक्तीला यशस्वी होण्यास कोणीच रोखू शकत नाही. चाणक्य नीती व्यक्तीला योग्य आणि अयोग्य याचा आरसा दाखवण्यास मदत करते. ज्यामुळं त्याला कधीच धोका मिळू शकत नाही आणि आयुष्यात नेहमीच यश मिळेल. चाणक्य नितीनुसार एखाद्या व्यक्तीवर संकट आले तर त्यावेळी त्याने कोणत्या गोष्टींची काळजी घ्यायला हवी व कुठे लक्ष द्यायला हवे, याबाबत सांगितले आहे.



सावध राहा!

आचार्य चाणक्य यांच्यानुसार एखाद्या व्यक्तीला संकटकाळात नेहमीच सावध राहायला हवे. संकटकाळात व्यक्तीसोमर समस्यांचा डोंगर असतो पण त्यावर मार्ग खूप कमी असतात. अशावेळी त्या व्यक्तीकडून करण्यात आलेली छोटीशी चूकही मोठी अडचण निर्माण करु शकते.

कुटुंबीयांच्या सुरक्षेकडे लक्ष द्या

चाणक्य नितीनुसार, प्रत्येक व्यक्तीचे पहिले कर्तव्य हे संकटकाळात आपल्या कुटुंबाची जबाबदारी घेणे. कुटुंब सुखरुप असेल तर त्यातून आरामात त्या संकटातून बाहेर निघू शकतो. त्यामुळं तुमच्या कुटुंबासाठी तुम्ही विशेष सुरक्षा घ्यायची गरज आहे.

आरोग्याकडे लक्ष द्या

आचार्य चाणक्य यांच्यानुसार, आरोग्य ही प्रत्येक व्यक्तीसाठी सगळ्यात मोठी जमापुंजी असते. त्यामुळं आपल्या आरोग्याची काळजी घेणे खूप जास्त गरजेचे आहे. जर तुमचे आरोग्य ठणठणीत असेल तर तुम्ही संकटातून बाहेर काढण्यासाठी अनेक प्रयत्न करु शकतात आणि संकटातून मुक्त होऊ शकतात. त्यासाठी शारीरिक आणि मानसिकरित्याही आरोग्यशाली असणे खूप गरजेचे आहे.

पैशांची बचत करा

आचार्य चाणक्य यांच्यानुसार, मनुष्याला संकटकाळात त्याच्याकडे असलेली संपत्ती व पैशांची बचत केली पाहिजे. जर त्या व्यक्तीकडे पुरेसे धन उपलब्ध नसेल तर खूप मोठी समस्या निर्माण होऊ शकते. पण जर तुमच्याकडे पुरेसे धन असेल तर त्या परिस्थितीतून तुम्ही सहज मार्ग काढू शकता. आचार्य चाणक्य यांच्यानुसार संकटकाळात पैसाच व्यक्तीचा सख्खा मित्र असतो. तसंच, ज्या व्यक्तीकडे पैशांची कमतरता किंवा अभाव असेल तर त्याला या परिस्थितीतून बाहेर काढण्यासाठी अनेक कठिण परिस्थितींचा सामना करावा लागतो.

# फिटनेस प्रेमींसाठी ५ आरोग्यदायी घटक

फिटनेस उत्साही लोक त्यांच्या फिटनेसची खुप काळजी घेताना दिसतात. ते नेहमीच संबंधित घटकांच्या शोधात असतात. रासायनिक सप्लिमेंटस बाजारात मोठ्या प्रमाणावर उपलब्ध असताना, आयुर्वेदिक घटकांकडे सहसा लक्ष दिले जात नाही. पण आयुर्वेद ही शतकानुशतके चालत आलेली जुनी भारतीय आरोग्य सेवा आहे. मन, शरीर आणि आत्मा यांचा समतोल साधून आरोग्य आणि निरोगीपणा राखणे हे त्याचे उद्दिष्ट आहे आणि ते उपचारापेक्षा प्रतिबंधावर अधिक लक्ष केंद्रित करते.



फिटनेससाठी आयुर्वेदात पोषण, व्यायाम आणि जीवनशैलीचा समावेश आहे. या दृष्टिकोनामध्ये आयुर्वेदिक औषधी वनस्पती आणि मसाले महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात. असे मानले जाते की ते चांगले पचन आणि मानसिक आरोग्यासह अनेक प्रकारचे फायदे देतात आणि प्रत्यक्षात तुमच्या शरीराचे आजारपणापासून संरक्षण करतात. डॉ. कृती सोनी यांनी सांगितलेल्या फिटनेस ५ आरोग्यदायी घटक पाहूया.

अश्वगंधा : मूळत: भारतातील, अश्वगंधा (विथानिया सोम्निफेरा) हे वृक्षाच्छादित झुडूप आहे. त्याची मुळे आणि बेरी एक सुप्रसिद्ध आयुर्वेदिक औषध बनवण्यासाठी वापरली जातात. हे अँडाप्टोजेन आहे, याचा अर्थ असा आहे की ते तुमच्या शरीराला तणावाचा अधिक प्रभावीपणे सामना करण्यास मदत करते. कॉर्टिसोल हा हार्मोन आहे जो तुमच्या अधिवृक्क ग्रंथी तणावाच्या प्रतिसादात तयार करतात आणि अश्वगंधा कोर्टिसोलची पातळी कमी करते असे अभ्यासातून दिसून आले आहे. शारीरिक आणि मानसिक तणाव दूर करण्यासाठी फिटनेस प्रेमींना याचा फायदा होऊ शकतो. अश्वगंधा स्नायूंची वाढ आणि रक्तातील साखरेची पातळी देखील सुधारू शकते.

शिलाजीत : हा एक घटक आहे जो आयुर्वेदिक औषधी पद्धतींमध्ये मोठ्या प्रमाणावर आजारांवर उपचार करण्यासाठी वापरला जातो. हे खनिजांमध्ये मुबलक प्रमाणात आहे आणि त्यात फुलविक ऍसिड म्हणून ओळखले जाते. व्यायाम करताना, फिटनेस उत्साही आवश्यक इलेक्ट्रोलाइटस गमावतात जे पाणी संतुलन, स्नायूंचे आकुंचन, मज्जातंतू आवेग आणि घामाद्वारे चयापचय नियंत्रित करण्यात मदत करतात. शिलाजीत विशिष्ट खनिज सामग्रीने समृद्ध आहे, ज्यामध्ये या इलेक्ट्रोलाइटसची जागा घेण्याची क्षमता आहे, त्यामुळे शारीरिक कार्यक्षमता आणि सहनशक्ती राखली जाते.

त्रिफळा : हा सूचीबद्ध तीन औषधी फळांपासून बनवलेला एक आयुर्वेदिक उपचार आहे: आवळा (एंब्लिका ऑफिशिनालिस, किंवा भारतीय गूसबेरी) बिभिताकी (टर्मिनेलिया बेलिरिका) हरिताकी (टर्मिनेलिया चेबुला) संशोधनानुसार, त्रिफळा संधिवात जळजळ कमी करू शकतो आणि कर्करोगाचा प्रसार कमी करू शकतो किंवा कमी करू शकतो. शिवाय, सुधारित पचन आणि तोंडाच्या आरोग्यासाठी देखील त्रिफळा फायदेशीर आहे. फिटनेस प्रेमींना त्यांच्या आहारात त्रिफळा समाविष्ट केल्याने मोठ्या प्रमाणात फायदा होऊ शकतो, कारण ते संपूर्ण आरोग्य आणि कल्याण वाढवू शकते. हे कोलन टोनर म्हणून कार्य करते आणि कोलनच्या ऊतींना मजबूत आणि टोनिंग करण्यास मदत करते. परिणामी, ते वजन नियंत्रित करण्यास मदत करते.

हळद : आणखी एक आवडता आयुर्वेदिक उपचार म्हणजे हळद हा घटक आहे जो वैशिष्ट्यपूर्ण पिवळा रंग देतो. त्याचा प्राथमिक सक्रिय घटक, कर्क्यूमिन, एक शक्तिशाली अँटिऑक्सिडेंट आणि दाहक-विरोधी आहे. टेस्ट-ट्यूब संशोधन सूचित करते की ते इतर दाहक-विरोधी औषधांइतकेच प्रभावी असू शकते, जर जास्त नसेल तर आणि त्यांच्या कोणत्याही नकारात्मक प्रभावाशिवाय. याव्यतिरिक्त, हळद रक्त प्रवाह वाढवून हृदयविकाराच्या प्रतिबंधात काही प्रमाणात मदत करू शकते, व्यायाम किंवा इतर निर्धारित औषधांप्रमाणेच प्रभावीपणे.

वेलची : मसाल्यांची राणी म्हणून ओळखली जाणारी वेलची प्राचीन काळापासून आयुर्वेदिक औषधांमध्ये वापरली जात आहे. संशोधनानुसार, उच्च रक्तदाब असलेल्यांना ते कमी करण्यासाठी वेलची पावडर वापरल्याने फायदा होऊ शकतो. असे पुरावे आहेत की वेलचीचे आवश्यक तेल इनहेल केल्याने व्यायाम करताना ऑक्सिजन शोषण्याची शरीराची क्षमता सुधारू शकते. आयुर्वेदिक अभ्यासानुसार वेलची मुळे रक्तदाब कमी होतो, श्वासोच्छवास सुधारतो आणि पोटातील अल्सर बरे होतात.

आयुर्वेदिक औषधी वनस्पती आणि मसाले शतकानुशतके पारंपारिक भारतीय औषधांचा अविभाज्य भाग आहेत. वाढत्या प्रमाणात वैज्ञानिक पुरावे त्यांच्या अनेक प्रस्तावित आरोग्य फायद्यांचे समर्थन करतात, ज्यात टाइप २ मधुमेह आणि हृदयरोगापासून संरक्षण समाविष्ट आहे. अशाप्रकारे, हे घटक कमी प्रमाणात घेतल्यामुळे तुमच्या जेवणाची चव आणि आरोग्य सुधारण्यास मदत होऊ शकते. असे म्हटले आहे की, मोठे डोस प्रत्येकासाठी योग्य असू शकत नाहीत, म्हणून आपल्या फिटनेस पथ्यामध्ये आयुर्वेदिक पूरक आहार सुरु करण्यापूर्वी आपल्या वैद्यकिय तज्ञांचा सल्ला घेणे महत्वाचे आहे.

# पूज्य भदंत ज्योतिरत्न महाथेरो यांच्या पवित्र पार्थिवावर पांढरा दिवसानंतर अंतिम संस्कार

नवी मुंबई (प्रतिनिधी) : देशातील जागतिक किर्तीचे विपश्यनाचार्य पूज्य भदंत ज्योतिरत्न महाथेरो यांचे शुक्रवार दिनांक ६ सप्टेंबर २०२४ रोजी अल्पशा आजाराने दु:खद निधन झाले आहे. त्यांच्या पवित्र पार्थिवावर अंतिम संस्कार रविवार दिनांक २२ सप्टेंबर २०२४ रोजी संध्याकाळी ४.३० वाजता दिवागांव स्मशान भूमी सेक्टर ९ ऐरोली नवी मुंबई येथे देश विदेशातील पूज्य भदंत थेरो,महाथेरो,पूज्य भिखू संघ आणि भिख्खूनी संघ आणि मान्यवरांच्या उपस्थितीत पवित्र पार्थिवावर अंतिम संस्कार विधी संपन्न होणार आहे. त्यावेळी मुंबई मधील सर्व श्रद्धावान धम्म उपासक आणि धम्म उपासिका यांना अंतिम संस्कार विधीला मोठ्या संख्येने उपस्थित राहावे. कारण हा मुंबईसह राज्यातील प्रथम संस्कार विधी आहे जो पांढरा दिवस नंतर केल्या जात आहे.

ज्या पूज्य भदंत थेरो,महाथेरो,यांचे महान धम्म कार्य असते.त्यांचे शिष्य अनुयाय उपासक उपासिक लाखोंच्या संख्येने असतात.म्हणूनच त्यांचे पवित्र पार्थिवावर अंतिम संस्कार न करता त्याचे एक महिना,तीन महीने सहा महीने किंवा वर्षभर फीरजर मध्ये योग्य ती औषध वापरुन ठेवण्यात येते.पण मुंबई महाराष्ट्र राज्यात आणि



देशात अशा कोणता ही कायदा नसल्यामुळे मृत्यू झालेल्या व्यक्तीच्या पार्थिवावर अंतिम संस्कार चोवीस तासात करण्याचा नियम आहे.पण पूज्य भदंत फरा बुद्धासरी महाथेरो यांनी वेग वेगळ्या राज्यातील पूज्य भदंत थेरो,महाथेरो,यांचे महान धम्म कार्य असते.त्यांना एक महिना पार्थिवावर अंतिम संस्कार करण्याची परवानगी दिली जाते हे नवी मुंबई महानगर पालिकेला पुराव्यासह समजावून सांगितल्यावर पांढरा दिवसाची परवानगी देण्यात आली आहे.त्यामुळे पूज्य भदंत ज्योतिरत्न महाथेरो यांच्या पवित्र पार्थिवावर अंतिम संस्कार रविवार दिनांक २२ सप्टेंबर २०२४ रोजी संध्याकाळी ४.३० वाजता दिवागांव स्मशान भूमी सेक्टर ९ ऐरोली येथे करण्यात येणार आहेत. त्यामुळेच मुंबई नवी मुंबई ठाणे पालघर सह राज्यातील सर्व श्रद्धावान धम्म उपासक आणि धम्म उपासिका यांनी पूज्य भदंत ज्योतिरत्न महाथेरो यांचे अंतिम दर्शन घेण्यासाठी प्रचंड गर्दी करत आहेत. त्यात महिला मंडळांची संख्या लक्षवेधी आणि प्रेरणादायी आहे. १२ सप्टेंबर पासून सकाळ संध्याकाळ नालंदा विपश्यना केंद्राच्या बुद्ध विहारात सूत्त पाठणाचा कार्यक्रम होत आहे.सर्व श्रद्धावान धम्म उपासक आणि धम्म उपासिका यांची भोजनाची व्यवस्था करण्यात येत आहे.२१ सप्टेंबरला त्याच्या जीवन संघर्षा वर धम्म प्रचार प्रसारवर विधी देशातील थेरो महाथेरो आणि श्रद्धावान धम्म उपासक आणि धम्म उपासिका शब्दसुमनाने भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करणार आहेत. ज्यांना शब्दसुमनाने भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करायची असेल त्यांनी पूज्य भदंत फरा बुद्धासरी महाथेरो यांच्याकडे नांव नोंदणी करा असे आवाहन करण्यात आले आहे.पूज्य भदंत ज्योतिरत्न महाथेरो यांच्या परलौकिक निर्वाण कामना निर्वाणीक सुखशांतीसाठी अट्ट परिककार व संघदान दररोज विहारात होत आशहे.

पूज्य भदंत ज्योतिरत्न महाथेरो नालंदा विपश्यना केंद्राचे संस्थापक अध्यक्ष होते.तसेच नालंदा सामाजिक शैक्षणिक केंद्राचे संस्थापक,सिलिगुडी हैदरपाडा विपश्यना ध्यान आश्रम चे पूज्य भदंत ज्ञानज्योति महाथेरो यांचे एकमेव शिष्य होते,अखिल भारतीय भिख्खू संघ (बुद्धगया),भारतीय संघराज भिख्खू महासंघ (कोलकत्ता) उत्तर बंगाल भिख्खू संघाचे आजीव सदस्य होते.

## साप्ताहिक राशिभविष्य

### दि. १५ सप्टेंबर २०२४ ते २१ सप्टेंबर २०२४

मेष : हळूहळू तुमची सर्व दृष्टीने प्रगती होणार आहे. मानसिक प्रसन्नता लाभेल. महत्त्वाचे निर्णय आज घेऊ नका. महत्वाची कामे पुढे ढकलावीत. हितशत्रूंचा त्रास जाणवेल. कर्मचारी वर्गाबरोबर मतभेदाची शक्यता आहे. नातेवाईकांचे उत्तम सहकार्य लाभेल.

वृषभ : महत्वाची कामे पुढे ढकलावीत. एखाद्या कामाची चिंता राहाणार आहे. व्यवसायाच्यादृष्टीने ग्रहमान चांगले आहे. आर्थिक लाभाचे प्रमाण चांगले राहील. संततिसौख्य लाभेल. कलेच्या क्षेत्रातील व्यक्तींना विशेष यश मिळेल. नवीन परिचय होतील. मुलामुलींच्यासंदर्भात एखादी चांगली घटना घडेल.

मिथुन: मनोबल व आत्मविश्वास वाढेल. एखादी मानसिक चिंता राहील. जबाबदारी वाढेल. कामाचा ताण व दगदग वाढेल. व्यवसायात उत्तम स्थिती राहाणार आहे. नोकरीतही समाधानकारक स्थिती राहील. ज्यांना नोकरीत बदली हवी आहे त्यांनी प्रयत्न करावेत. व्यवसायात वाढ होईल.

कर्क : मित्र, सहकारी यांच्यावर फार विसंबून राहून चालणार नाही. लोकांचे सहकार्य, लोकांची मदत अपेक्षित धरू नका. शत्रूपिडा कमी राहील. कर्मचारी वर्गाचे सहकार्य लाभेल. तुमच्या कार्यक्षेत्रात संधी लाभेल. मनोबल वाढेल. कामाचा ताण जाणवेल.

सिंह : मनोबल वाढेल. नातेवाईकांशी मतभेदाची शक्यता आहे. खर्चाचे प्रमाण वाढेल. प्रवास शक्यतो टाळावेत. शुक्र वृश्चित राशीत गेला आहे. खर्चाचे प्रमाण कमी होईल. गडी, कर्मचारी यांचे सहकार्य लाभेल. महत्वाचे निर्णय नकोत. मुलामुलींच्यासंदर्भात मनस्ताप होण्याची शक्यता आहे.

कन्या : व्यवसायाच्यादृष्टीने अत्यंत चांगली गोष्ट आहे. व्यवसाय वाढेल. नोकरीमध्ये समाधानकारक स्थिती राहील. व्यवसायाच्या जागेचे प्रश्न सुटतील. मनोबल वाढेल. सार्वजनिक कामात प्रतिष्ठा लाभेल. एखादी भाग्यकारक घटना घडेल. प्रगती वेगाने होईल.

तूळ : आर्थिक लाभाच्यादृष्टीने दिवस चांगला आहे. मात्र एखादी मानसिक चिंता राहील. महत्वाचे निर्णय घेण्याचे टाळावे. वैवाहिक जीवनात मतभेदाची शक्यता आहे. उधारी, उसनवारी वसूल होईल. शासकीय कामे पुढे ढकलावीत. मनोबल वाढेल. आरोग्य उत्तम राहील. व्यवसाात धाडस शक्यतो टाळावे.

वृश्चिक : व्यवसायात आर्थिक लाभ होतील. मात्र आर्थिक क्षेत्रामध्ये काही अडचणी जाणवतील. संततिसौख्य उत्तम लाभेल. वैवाहिक सौख्य लाभेल. मित्रांचे उत्तम सहकार्य लाभेल. बौद्धिक व शैक्षणिक क्षेत्रातील व्यक्तींना विशेष लाभेल. मित्रांचे चांगले सहकार्य लाभेल.

धनु : आरोग्य चांगले राहाणार आहे. प्रॉपर्टीचे व गुंतवणुकीचे व्यवहार टाळावेत. वैवाहिक जीवनात सौख्य लाभेल. कर्मचारी, गडी, नोकरचाकर यांचे सहकार्य लाभेल. विरोधकांवर मात कराल. भागीदारी व्यवसायात प्रगती होईल. अनेकांचे सहकार्य लाभेल. नातेवाईकांशी मतभेद होतील.

मकर : महत्वाचे व्यवहार पुढे ढकलावेत. मित्र, सहकारी, वरिष्ठ व वडिलधारी व्यक्ती यांच्या आश्वासनावर भरवसा नको. नातेवाईकांचे सहकार्य लाभेल. कला, संगीत, नाट्य क्षेत्रातील व्यक्तींना विशेष यश मिळेल. आर्थिक क्षेत्रात तुमचा उत्कर्ष चालू राहाणारच आहे. महत्वाची कागदपत्रे गहाळ होणार नाहीत ना? किंवा हरवणार नाहीत ना याची काळजी घ्यावी.

कुंभ : व्यवसायात आर्थिक लाभ जोरदार होणार आहेत. उधारी, उसनवारी वसूल होईल. कर्ज प्रकरणे मंजूर होतील. व्यवसायात धाडस करावयास हरकत नाही. काहींना अचानक धनलाभाची शक्यता आहे. विरोधकांवर मात कराल. सामाजिक कार्यात प्रतिष्ठा लाभेल.

मीन : दिवसेंदिवस तुमची प्रगती होणार आहे. मन आनंदी, आशावादी राहील. कौटुंबिक सौख्य लाभेल. संततिसौख्य लाभेल. वैवाहिक जीवनात आनंदी वातावरण राहील. विवाहेच्छुंचे विवाह जमतील. कामाचा ताण जाणवेल. तुमच्यावर अधिक जबाबदारी सोपवली जाईल. व्यवसायाच्या वाढीसाठी अधिक प्रयत्न कराल.

## इतिहासात आजचा दिवस १५ सप्टेंबर

अंतरराष्ट्रीय

१९१६ – पहिल्या महायुद्धात इंग्रज व जर्मन यांच्यामधील युद्धात जगात सर्वप्रथम रणगाड्यांचा वापर केला गेला.

१९४१ – जर्मन सैन्याने लेनिनग्राडला वेढा घातला.

२००६ – जेट एअरवेजचे संस्थापक नरेश गोयल आणि इंग्लंड क्रिकेट संघातील एकमेव शीख सदस्य मॉंटी पनेसर यांनी गुजराथी–इंग्रजी द्विभाषिक साप्ताहिकाचा 'मॅन ऑफ द इयर' आणि 'स्पोटर्स पर्सनॅल्टी ऑफ द इयर' पुरस्कार जिंकला.

२००७ – भारताच्या पंकज आडवाणीने सिंगापूरमध्ये आपल्याच देशाच्या ध्रुव सितवालाला पराभूत करुन सलग दुसऱ्यांदा आयबीएसएफ जागतिक बिलियर्ड पुरस्कार जिंकले.

राष्ट्रीय

१५८४ – संत एकनाथांनी ज्ञानदेवांच्या सूचनेवरून ज्ञानेश्वरीची शुद्ध प्रत तयार करण्याचे काम पूर्ण केले. त्यामुळे सर्व सामान्य जनतेत ज्ञानेश्वरीचा प्रसार होणे सोपे झाले.

१९१० – नाशिकच्या 'अभिनव भारत' या गुप्त संघटनेवरील खटल्याचे कामकाज मुंबई उच्च न्यायालयासमोर सुरु झाले.

१९४० – सशर्त सहकार मागे घेऊन इंग्रज सरकारविरुद्ध सत्यांग्रहाचे शस्त्र वापरण्याचा ठराव कॉंग्रेस कार्यकारिणीने केला.

१९४५ – आझाद हिंद सैन्यातील सैनिकांना युद्धकैदी म्हणून वागवले नाही, तर आंदोलन करण्याचा कॉंग्रेसचा इशारा.

१९५३ – संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेच्या अध्यक्षा म्हणून विजयालक्ष्मी पंडित यांची निवड झाली.

१९५९ – दिल्ली दूरदर्शन केंद्राचे कार्यक्रम प्रत्यक्ष सुरू झाले.

२००३ – ग्रॅहॅम स्टेन्सच्या मृत्यूबद्दल भुवनेश्वर सत्र न्यायालयाने दारासिंग व त्याच्या मुलांना दोषी ठरवले.

२००४ – 'त्रिशूल' या भारतीय क्षेपणास्त्राची यशस्वी चाचणी करण्यात आली.

२००६ – मास्टर ब्लास्टर सचिन तेंडूलकर एक दिवसीय आंतरराष्ट्रीय क्रिकेट सामन्यात सर्वात जास्त षटकार मारणारा चौथा खेळाडू बनला.

२००६ – भारतीय क्रिकेट नियंत्रण मंडळाचे माजी अध्यक्ष ए.सी.मुथय्या यांची आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेच्या नवीन अध्यक्षांची निवड करणाऱ्या ६ सदस्यीय समितीच्या अध्यक्षपदी निवड करण्यात आली.

२००८ – खैरलांजी हत्या प्रकरणी भंडारा फास्टट्रक कोर्टाने दलित कुटूंबातील चार जणांच्या हत्ये प्रकरणी आठ जणांवर आरोप सिद्ध केले. अकरा जणांवर दोषपत्र ठेवण्यात आले होते. त्यापैकी आठ जणांवर आरोप सिद्ध करण्यात आले.

२००८ – भारताने नेपाळमध्ये संपन्न झालेल्या दक्षिण आशियाई ज्युदो चॅम्पियनशिपमध्ये आपला दबदबा कायम राखत ११ सुवर्णांसह एक रौप्य पदक जिंकले.

हे पत्रक, मालक, संपादक, प्रकाशक रघुनाथ बनसोडे यांनी मुद्रक महेश मोतीराम राठोड यांनी मयूर ऑफसेट प्रिंटर्स, मेन रोड, मित्र नगर, लातूर, जि.लातूर - ४१३ ५१२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक लातूर प्रभात, पवन कॉलनी, कृपासदन शाळेजवळ, लातूर (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - रघुनाथ वाघोजी बनसोडे, मो.८८३०२५०६४५
(पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकाची जबाबदारी) RNI No.: - MAHMAR/2017/72894